# FIRST INFORMATION REPORT

**Form : 1-A**

## पहिली खबर

(Under Section 154 Cr. P. C.)

( फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये )

**No.** 0372449

1. *Dist. भंडारा *P.S. तुमसर *Year २०१९ *FIR No. ६५५/१९ *Date २८/१२/२०१९
जिल्हा पोलीस ठाणे वर्ष पहिली खबर क्र. तारीख

2. (i) *Act मा.वा.का. १९८८ (सुधारीत अधिनियम २०१८) *Sections कलम-८
अधिनियम कलमे

(ii) *Act *Sections
अधिनियम कलमे

(iii) *Act *Sections
अधिनियम कलमे

(iv) *Other Acts & Sections
इतर अधिनियम व कलमे

3. (a) *Occurrence of Offence : *Day शुक्रवार *Date From २८/१२/१९ *Date To २८/१२/१९
अपराधाची घटना वार तारीख पासून तारीख पर्यंत

*Time Period दुपारी *Time From १४:०५ वा *Time To —
वेळेचा अवधी पासून पर्यंत

(b) Information received at P. S. Date : २८/१२/२०१९ *Time १४:०५ वा.
पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याची तारीख वेळ

(c) General Diary Reference Entry No (s) ३९/२०१९ *Time १८/४९ वा.
सर्वसाधारण रोजनिशीचा संदर्भ क्र. वेळ

4. Type of Information : वाहन व ड्रायव्हर यांची लायसन्स तपासणी *Written / Oral : लेखी
माहितीचा प्रकार लेखी/तोंडी

5. Place of Occurrence : (a) *Direction and Distance from P. S. पंचायत समिती तुमसर रोडवर लेखा विभाग कार्यालय Beat No. खापा घाट
घटनेचे ठिकाण पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर गस्तक्षेत्र क्र.

(b) *Address : पंचायत समिती तुमसर रोडवर लेखा विभाग कार्यालय तुमसर ता. तुमसर जि. भंडारा
पत्ता

(c) *In case outside limit of this Police Station, then the
या पोलीस ठाण्याच्या हद्दीच्या बाहेर असल्यास, त्या पोलीस ठाण्याचे नांव

Name of P.S. Dist. :
पोलीस ठाणे जिल्हा

6. Complainant/Informant :
तक्रारदार / खबरी

(a) Name सतिश खिरसागर
नांव

(b) Father's / Husband's Name सुधाकर खिरसागर
पित्याचे / पतीचे नांव

(c) Date / Year of Birth : २९ वर्ष (d) Nationality : भारतीय
जन्म तारीख वर्ष राष्ट्रीयत्व

(e) Passport No. : — Date of Issue : — Place of Issue —
पारपत्र क्र. दिल्याची तारीख दिल्याचे ठिकाण

(f) Occupation : वाहन चालक
व्यवसाय

(g) Address राजेंद्र वार्ड, मोहाडी, ता. मोहाडी जि. भंडारा.
पत्ता

के-२८३

# फिर्याद

दिनांकः—२७/१२/२०१९.

मी सतिश सुधाकर क्षिरसागर, वय २९ वर्षे, धंदा— वाहन चालक, रा. राजेंद्र वार्ड, मोहाडी ता. मोहाडी जिल्हा भंडारा मो.नं. ९७६५६८०९८०

मी दिनांक २७/१२/२०१९ रोजी पोलीस निरीक्षक श्री. योगेश्वर पारधी ला. प्र. वि. भंडारा यांचे समक्ष एका लोकसेवकाविरूध्द लाच मागणी संबधाने तोंडी तक्रार नोंदविली. मी नोंदविलेली तक्रार खालील प्रमाणे आहे.

" मी समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग भंडारा कार्यालय येथे हजर येवुन तोंडी फिर्याद देतो की, दिनांक २० जानेवारी २०१९ पासुन, १९ फेब्रुवारी २०२० पर्यत माझे टाटा सुमो हे वाहन, क्र. एम.एच ४०/वाय ६३६९ हे उपविभागीय अभियंता, ग्रामिण पाणी पुरवठा उपविभाग, पंचायत समिती तुमसर येथे ओम साई टयुरस् अॅण्ड ट्रव्हल्स सातोना ता. मोहाडी जिल्हा भंडारा यांच्यामार्फतीने भाडे तत्वावर रूपये ३१,०००/— प्रति महीना व पुढील प्रति किमी करीता १६/— रूपये या प्रमाणे उपलब्ध करून देण्यात आली आहे.

सदर वाहनांचे मासीक बिल काढुन देण्यासाठी श्री. अविनाश रिनके, साहेब, पंचायत समिती तुमसर यांनी मला रूपये ५००/— लाचेची मागणी केलेली आहे. मला रिनके साहेबांना माझ्या वाहनाचे मासीक बिल काढुन देण्यासाठी ५००/— रूपये लाच देण्याची मुळीच इच्छा नाही. लाच म्हणुन देण्यासाठी मी ५००/— रूपये सोबत आणले आहे. करीता मी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय भंडारा येथे त्यांचे विरूध्द कार्यवाही होण्यास तक्रार देत आहे. व श्री. अविनाश रिनके, साहेब यांचेशी माझे कसल्याही प्रकारे जुने वैमनस्य नसुन आर्थीक देवाण—घेवाणीचे व्यवहार नाही. तरी त्यांचेविरूद्ध कायदेशीर कार्यवाही होणेस विनंती आहे.

. पोलीस निरीक्षक श्री. पारधी यांनी लाचेच्या संबंधाने सापळा पडताळणी व सापळा कार्यवाही आयोजित करण्यासाठी दोन शासकीय पंचाना बोलावून घेवून त्यांना मी दिलेली तोंडी तक्रार संगणकावर टंकलिखित करून, त्यांची प्रिंट काढुण, ती वाचण्याकरीता दिली व पंचांनी त्याचेवर सहया केल्या. त्यानंतर ५००/— रूपये सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. पारधी आणि दोन्ही पंचासमक्ष हजर केले. त्यांनी त्याचेवर पावडर लावून, एका लॅम्प चे उजेडात निळसर रंगाची चकाकी दिसत असल्याचे, त्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले.

पुढील पडताळणी कार्यवाही कामी खापा चौक परिसरात दोन्ही पंच, सापळा कार्यवाही स्टॉप सह आलो. त्यानंतर पंचासमक्ष मला आणि पंचाना तक्रारीची पडताळणी करण्याकरीता सुचना दिल्या. त्यांनतर पडताळणी करीता मी, व पंच अनिकेत रामभाऊ वैद्य यांचे सह श्री. अविनाश रिनके, साहेब, यांचे कडे त्यांचे कार्यालय पंचायत समिती तुमसर येथे व्हाईस रेकॉर्डर सुरू करून माझ्या गळयात घालुन दिल्यानंतर मी पंच क्र. १ सह आपले चारचाकी वाहनाने गेलो. पंचायात समिती तुमसर येथील लेखा विभाग कार्यालय येथे जावून श्री. अविनाश रिनके, साहेब यांचेशी बोलणी केली असता त्यांनी लाचेची मागणी न करता तु अर्ध्या तासात ये असे म्हटल्यावर मी परत खापा चौक परिसरात परत आलो.

त्यानंतर थोडया वेळाने रिनके साहेबांनी बोलाविल्यानुसार पंच क्र. १ यांचे सह पुन्हा श्री. अविनाश रिनके, साहेब, यांना भेटण्या करीता पंचायत समिती कार्यालय तुमसर येथे व्हाईस रेकॉर्डर सुरू करून माझ्या गळयात घालुन गेलो तेव्हा रिनके साहेब हे लेखा विभाग पंचायत समिती येथे हजर होते. मी त्यांचे जवळ जावून माझ्या गाडीच्या मासीक बिलाबाबत बोलणी केली

**Form : 1-B**

**No.** 0372449

7. Details of known / suspected / unknown accused with full particulars :

माहित असलेल्या / संशयीत / माहित नसलेल्या आरोपीचा संपूर्ण तपशील .

(Attach separate sheet if necessary)

(आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा)

आरोपी- अभिलाषा महादेव शिलके, वय- ५६ वर्ष

पद- सहायक लेखा अधिकारी पंचायत समिती तुमसर रा.

प्रेस कॉलोनी खात रोड भंडारा

Physical features, deformities and other details of the suspect :

संशयिताची शारीरिक ठेवण, व्यंग आणि इतर तपशील :

| *Sex<br>लिंग | *Date/Year of Birth<br>जन्मतारीख / वर्ष | *Build<br>बांधा | *Height in Cms.<br>उंची (सें. मी. मध्ये) | *Complexion<br>वर्ण | *Identification Mark(s)<br>ओळख |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| | | | | | |

| *Deformities/Peculiarities<br>व्यंग / वैशिष्ट्ये | *Teeth<br>दात | *Hair<br>केस | *Eye<br>डोळे | *Habit(s)<br>सवयी | *Dress Habits<br>पोशाखाच्या सवयी |
|---|---|---|---|---|---|
| (7) | (8) | (9) | (10) | (11) | (12) |
| | | | | | |

| *Languages/Dialect<br>भाषा / बोली भाषा | PLACE OF | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | *Burn Mark<br>भाजल्याची खूण | *Leucoderma<br>कोड | *Mole<br>तीळ | *Scar<br>व्रण | *Tattoo<br>गोंदण |
| (13) | (14) | (15) | (16) | (17) | (18) |
| | | | | | |

These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect. This will be used only for the purpose of preliminary retrieval to assist I. O.

जर तकारदार / खबरीने संशयीत बद्दल वरील १ किंवा अधिक रकान्यातील माहिती दिली तरच भरावी. तपासी अधिकाऱ्याने प्राथमिक पातळीवर तपास करण्यासाठी वरील माहिती उपयोगात आणावी

A database created will subsequently link one suspect in several cases, if any.

या अनुषगाने तयार झालेल्या माहितीचा उपयोग संशयीताचा इतर गुन्ह्यातील सहभाग स्पष्ट करेल

A comprehensive and complete data on all fields will again be prepared when any accused is arrested irrespective of previous suspicion.

वरील रकान्यातील संपूर्ण माहिती ज्यावेळी संशयीतास अटक करण्यात येईल त्यावेळी पुनःश्च तयार करावी

के-२८३

असता. त्यांनी '' माझ्या गाडीचे मासीक बिल काढुन देण्यासाठी '' ५०० रूपये लाचेची मागणी केली. मी लाच रक्कम थोडया वेळात आणून देतो असे सांगुण खापा चौक परिसरात पंच क्र १ याचे सह परत आलो. रिनके यांनी लाच रक्कम त्यांचे कार्यालय लेखा विभाग कार्यालय पंचायत समिती तुमसर येथे स्विकारण्याची तयारी दर्शविली होती. मी पंचासह परत आल्यावर अे.सी.बी. येथील अधिका–यांनी यांनी माझ्या गळयातील व्हाईस रेकॉर्डर काढुन त्यामधिल संरक्षित संभाषन ऐकुण लाचेची मागणी झाली असल्याची शहानिशा केली.

सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. पारधी यांनी खापा चौक परिसरातुन सापळा कार्यवाही करीत असतानां माझ्या गळयात व्हाईस रेकॉर्डर लावून पावडर लावलेल्या ५००/– रू. ची एक नोट माझ्या जिन्स पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात पंच श्री. मांढरे यांचे हस्ते ठेवली. त्यानंतर मी रिनके साहेब यांचेकडे पंचायत समिती कार्यालय तुमसर येथील त्यांचे लेखा विभाग कार्यालय येथे पंच वैद्य यांचेसह गेलो असता रिनके साहेब हे हजर नव्हते. थोडया वेळाने रिनके साहेब हे त्यांचे कार्यालयात हजर आले. त्यांनी मला मागणी केलेली ५००/– रूपये लाचेची रक्कम आपल्या उजव्या हातांनी स्विकारून लेखा विभागातील ते स्वतः काम करीत असलेल्या टेबलावर असलेल्या फाईल खाली ठेवली.

वरिलप्रमाणे लाच रक्कम श्री. अविनाश रिनके यांनी स्विकारल्यानंतर श्री. पारधी सर यांना ठरल्याप्रमाणे ईशारा दिला. श्री. पारधी सर हे स्वतः व स्टॉफ सह त्या ठिकाणी आले. रिनके साहेब यांनी लाचेची रक्कम आपले उजवे हातांनी स्विकारून लेखा विभागातील ते स्वतः काम करीत असलेल्या टेबलावर असलेल्या फाईल खाली ठेवल्याने पंच श्री. मांढरे यांनी ती ती काढुन त्यावर चमकनारी पावडर दिसत असल्याची शहानिशा निळया लाईटचा उजेड टाकुन केली आणि त्या नोटावरिल क्रमांकाची शहानिशा करून मी सादर केलेली तीच नोट असल्याची खात्री केली. ती लाच रक्कम जप्त करून ताब्यात घेतली.

श्री. अविनाश रिनके लेखा अधिकारी, पंचायत समिती तुमसर यांनी '' **माझे टाटा सुमो हे वाहन, क्र. एम.एच ४०/ वाय ६३६९ हे उपविभागीय अभियंता, ग्रामिण पाणी पुरवठा उपविभाग पंचायत समिती तुमसर येथे ओम साई टयुरस् अॅण्ड ट्रव्हल्स सातोना ता. मोहाडी जिल्हा भंडारा यांच्यामार्फतीने भाडे तत्वावर रूपये ३१,०००/– प्रति महीना व पुढील प्रति किमी करीता १६/ रूपये या प्रमाणे उपलब्ध करून देण्यात आली होती. सदर गाडीचे मासीक बिल काढुन देण्यासाठी** '' ५००/– रू. ची लाच रक्कम आज रोजी माझ्या कडुन स्विकारली. ती रक्कम रिनके यांच्या ताब्यातुन पोलीसांनी सापळा रचून जप्त केली आहे. श्री. अविनाश रिनके लेखा अधिकारी, पंचायत समिती तुमसर यांनी लाचेची मागणी करून ती स्विकारल्याने त्यांचे विरूध्द कार्यवाहीस्तवः मी फियार्द देत आहे.

माझी वरिल फिर्याद प्रिंट काढुन मला वाचण्यास दिली असुन, ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर संगणकावर टंकलिखीत करण्यात आली आहे. त्यावर मी सही केली.

सतीश सुधाकर [illegible]

**Form : 1-C**

No. 0372449

8. Reasons for delay in reporting by the Complainant/Informant :
तक्रारदाराने, खबऱ्याने तक्रार करण्यातील विलंबाची कारणे
सापळा कार्यवाही पूर्ण होण्यास योग्य वेळ लागल्याने

9. Particulars of properties stolen/involved (Attach separate sheet, if necessary) :
चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा)

10. *Total value of properties stolen/involved : ४००१/- रु.
चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य :

11. *Inquest Report / U. D. Case No., if any :
मरणान्वेषण अहवाल / यु. डी. प्रकरण क्र., जर असल्यास :

12. F. I. R. Contents (Attach separate sheets, if required) :
पहिल्या खबरीतील हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावेत) : प्रकरण अशा प्रकारे आहे की यातील आरोपी फिर्यादीचा त्यांचे टाटा सुमो क्र. MH-36/Y 6369 हे उपविभागीय अभियंता ग्रा. पा. पुरवठा उपविभाग तुमसर येथे ओम साई ट्रॅव्हल्स अँड टूरिस्ट साकोली ता. मोहाडी जि. भंडारा यांच्या मालकीचे आहे तत्वावर रुपये ३९,००० रु. प्रति महिना व पुढील प्रति किमी करिता १६ रु. प्रमाणे उपलब्ध करून देण्यात आली होती सदर गाडीचे मासिक बिल काढून देण्यासाठी [illegible] कार्यवाही करण्यासाठी ४००१/- रु. लाचेची मागणी करून सापळा कार्यवाही दरम्यान आरोपीने ४००१ रुपये स्विकारल्याने गुन्हा नोंद.

13. Action taken : Since the above report reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2., registered the case and took up the investigation/directed* ................ Rank ................ to take up the investigation/Refused investigation/transferred to P. S. ................ on point of jurisdiction.

केलेली कार्यवाही : बाब क्र. २ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये अपराध घडल्याचे वरील अहवालावरुन दिसून आल्यामुळे प्रकरण नोंदवले आणि तपासाचे काम हाती घेतले सोमेश्वर पारधी
पदनाम पो. नि. ला. प्र. वि. भंडारा यांना तपासाचे काम हाती घेण्याचा निर्देश दिला / तपास करण्याचे नाकारले / अधिकारितेच्या मुद्यावर ................ पोलीस ठाण्याकडे हस्तांतरीत केले.

F. I. R. read over to the Complainant/Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/Informant free of cost.
पहिली खबर तक्रारदाराला / खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदवली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला / खबरीला प्रत मोफत दिली

14. Signature/Thumb impression of the Complainant/Informant.
तक्रारदाराची / खबरीची सही / अंगठ्याचा ठसा

Signature of the Office-in-charge, Police Station
पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याची सही

*Name : [illegible]
नाव

*Rank : पो. हवा No. : १००६
पदनाम पो. स्टे तुमसर क्रमांक

15. Date & Time of despatch to the court : २९/१२/२०११.
कोर्टात पाठविल्याची तारीख व वेळ

के-२८३